<u>**रे.दि.मु.नं. ६७७/२०१२ मधील निशाणी ५० वरील आदेश**</u>

(दिनांक २४/०२/२०२१)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील वादी नं.३ श्रीमती सुशिलाबाई जयसिंग पाटील या दिनांक ०२/०५/२०१३ रोजी तर प्रतिवादी नं. २ श्री. संपतराव निवृत्ती पाटील हे दिनांक ३०/१०/२०१८ रोजी मयत झाले. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास अनुक्रमे ७ वर्षे ९ महिने १५ दिवस तसेच २ वर्षे ३ महिने व १८ दिवसाचा विलंब झाला आहे. सदर मयत वादी नं.३ व प्रतिवादी नं.२ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेण्याची कायदेशीर माहिती वादींना नसल्याने तसेच वादीचे विधीज्ञ श्री. व्ही. एम. पंडीतराव हे देखील २०१६ मध्ये मयत झाल्याने सदर वादी नं. ३ व प्रतिवादी नं. २ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यामुळे सदर वादी नं. ३ व प्रतिवादी नं. २ विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द करुन त्यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. प्रतिवादी नं. २अ तर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे व अर्ज मंजुर करणेचा झाल्यास वादींवर खर्च बसवणेची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. दाव्याचे स्वरुप विचारात घेता दाव्यामध्ये वादी प्रतिवादींचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत वादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. २ चे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय दाव्याच्या वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

# आ दे श

१.  वादी क्र. ३ श्रीमती सुशिलाबाई जयसिंग पाटील व प्रतिवादी क्र. २ श्री. संपतराव निवृत्ती पाटील चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब रक्कम रु. २०००/– खर्चावर माफ करण्यात येतो.

२. वादींनी खर्चाची रक्कम रु. २०००/– न्यायालयात जमा करावी, पैकी रक्कम रु. १०००/– प्रतिवादी क्र. २अ यांना अदा करावी व उर्वरीत रक्कम रु. १०००/– विधी सेवा प्राधीकरणाकडे वर्ग करण्यात यावी.

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– २४/०२/२०२१  सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

<u>**रे.दि.मु.नं. ६७७/२०१२ मधील निशाणी ४८ वरील आदेश**</u>

(दिनांक २४/०२/२०२१)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील वादी नं.३ श्रीमती सुशिलाबाई जयसिंग पाटील या दिनांक ०२/०५/२०१३ रोजी तर प्रतिवादी नं. २ श्री. संपतराव निवृत्ती पाटील हे दिनांक ३०/१०/२०१८ रोजी मयत झाले. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास अनुक्रमे ७ वर्षे ९ महिने १५ दिवस तसेच २ वर्षे ३ महिने व १८ दिवसाचा विलंब झाला आहे. सदर मयत वादी नं.३ व प्रतिवादी नं.२ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेण्याची कायदेशीर माहिती वादींना नसल्याने तसेच वादीचे विधीज्ञ श्री. व्ही. एम. पंडीतराव हे देखील २०१६ मध्ये मयत झाल्याने सदर वादी नं. ३ व प्रतिवादी नं. २ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यामुळे सदर वादी नं. ३ व प्रतिवादी नं. २ विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. प्रतिवादी नं. २अ तर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. अर्जदार यांच्या अर्जातील कथने व अभिलेखाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वादी यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादी नं.३ या दिनांक ०२/०५/२०१३ रोजी तर प्रतिवादी नं. २ हे दिनांक ३०/१०/२०१८ रोजी मयत झाले आहेत. वाद विषयाचे अवलोकन करता दावा अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी आहे. दाव्यामध्ये वादी व प्रतिवादींचे हक्कहितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे गुंतागुंत टाळण्याकरीता मयत वादी प्रतिवादींच्या वारसांना या कामी दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. सबब, वादी नं. ३ व प्रतिवादी नं. २ विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे योग्य होईल. सबब, आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजुर.

२. वादी नं. ३ व प्रतिवादी नं. २ विरुद्धचा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

(भूषण र. ठाकूर)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर.

दिनांकः– २४/०२/२०२१

**<u>रे.दि.मु.नं. ६७७/२०१२ मधील निशाणी ३७ वरील आदेश</u>**

(दिनांक २४/०२/२०२१)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील वादी नं.३ श्रीमती सुशिलाबाई जयसिंग पाटील या दिनांक ०२/०५/२०१३ रोजी मयत आहेत त्यांना वादी नं. ३/१ रविंद्र जयसिंग पाटील व वादी नं. ३/२ राजेंद्र जयसिंग पाटील हे वारस आहेत. तसेच प्रतिवादी नं. २ श्री. संपतराव निवृत्ती पाटील हे दिनांक ३०/१०/२०१८ रोजी मयत आहेत. त्यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे प्रतिवादी क्र. २अ भानुदास संपतराव पाटील, क्र. २ब रामदास संपतराव पाटील, क्र. २क सौ. पद्मीनी वसंत पवार, २ड सौ. रजनी रावसाहेब सावंत व २इ सौ. मनिषा संपत पाटील असे वारस आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी अनुक्रमे वादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. २ चे वारस म्हणुन दाखल करुन घेणेस परवानगी मिळण्यासाठी केला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. वादीच्या अर्जातील कथने व अभिलेखाचे अवलोकन केल्यास वादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. २ हे अनुक्रमे ०२/०५/२०१३ व ३०/१०/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी यांच्या कथनानुसार मयत वादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. २ यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास दावा गुणदोषावर निकाली करण्यास मदत होणार आहे. भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजुर.

२. अर्जात नमुद केलेप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसांत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादींना देखील पुरवावी.

३. अर्जाचा खर्च वादीनी सोसावा.

Bhushan Ramesh Thakur
Digitally signed by Bhushan Ramesh Thakur
Date: 2021.02.24 17:38:50 +0530

(भूषण र. ठाकूर)
दिनांकः– २४/०२/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. Pradip T. Patil |
| Court | : | Jt. Civil Court Sr.Dn.Islampur |
| Date of Order/Judgment | : | 24/02/2021 |
| Typed on | : | 24/02/2021 |
| Signed by P.O. on | : | 24/02/2021 |
| Uploaded on | : | 24/02/2021 |